शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.११/२०२२

| | |
|---|---|
| श्री. अनिल आण्णासो दणाणे<br>रा.पाण्याच्या टाकीजवळ, सावळवाडी<br>ता. मिरज, जि. सांगली | } तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | |
|---|---|
| १. आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी,<br>दक्षिण शिवाजी नगर, सांगली.<br><br>२. श्री.वसंतराव बंडुजी पाटील ट्रस्ट, सांगली | } वि.प. |

श्री.वसंतराव बंडुजी पाटील ट्रस्ट, सांगली यांचे आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली यांचेकडील शिक्षक श्री. अनिल आण्णासो दणाणे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२१/०४/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी गेली १० वर्ष वरील महाविद्यालयात सहा.प्राध्यापक पदावर कार्यरत आहे. महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती उत्तम असूनही अत्यंत अल्प वेतनात काम करावे लागत आहे. सुरवातीला माझी नेमणूक ॲडव्होक असताना अकरा महिन्यांची ठरली होती. पण केवळ नऊ महिन्यांचे वेतन देण्यात आले तेही अल्प. दिनांक २२/०५/२०१४ रोजीच्या विद्यापीठ पत्रानुसार कायम स्वरूपाची नेमणूक देण्यात आली. तरीही जून २०१४ ची सॅलरी काढली काढली नाही. माझा ऑगस्ट २०१२ पासून ते जानेवारी २०१६ पर्यंत पी.एफ. जमा केला नाही. माहे फेब्रुवारी २०१६ ते ऑक्टोंबर २०१६ तसेच फेब्रुवारी १७ चा पी.एफ ची रक्कम कट करून घेतली. पण ती माझ्या पी.एफ. खात्यावर वर्गच केली नाही. माहे ऑगस्ट १२ पासून सप्टेंबर २०१७ पर्यंत माझ्या अल्प वेतनातून जवळपास लाखो रूपयांची रक्कम जबरदस्तीने कपात करण्यात आली. व ते मी देण्यास नकार दिल्याने माझे वेतन कोणत्याही कारणास्तव कमी करण्यात आले. माझा आवाज बंद करण्यासाठी प्राचार्यांनी स्वतःच एक निनावी पत्र पाठवून माझ्यावर लैंगिक शोषनाचे आरोप केले व त्या पत्राची पत्र कायदेशीर कारवाईसाठी मागीतली असता तर ते देण्यास त्यांनी नकार दिला. माहे जुलै २०१६ ते जानेवारी २०१७ ला मला पगाराचा स्लॅब मध्ये जवळपास तीन वर्षानंतर परर्मनंट झाल्यानंतर घालण्यात आले. पण ते अल्प होते. वेतनाचा स्लॅब मध्ये १६ साली घातल्यानंतर त्यातील एक रूपयाचा फरक देण्यात आला नाही. ऑगस्ट १२ पासून ते एप्रील २२ पर्यंत माझ्या वेतनातील फरकाची

रक्कम देण्यात आलेली नाही. जबरदस्तीने आमच्या प्राचार्यांनी आम्हांला पी.एफ. नको असं लिहून देण्यास सांगितले. व ते आम्ही दिले. आजतागायत मला माझ्या महाविद्यालयातील अपॉईमेंट ऑर्डर ची मुळ प्रत देण्यात आलेली नाही. मला मागील वेतनातील फरक व भविष्यातील वेतन हे शासकीय नियमानुसारच मिळावे ही विनंती. तसेच माझ्या ग्रॅच्युईटीची तरतूद अजून करण्यात आलेली नाही.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारदार, श्री.अनिल आण्णासो दणाणे शिक्षक यांनी अर्ज क्रं. ३७२ मध्ये नमूद केलेप्रमाणे आम्ही सादर केलेल्या पत्रानुसार खोटी व चुकीची आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

सोबत खुलासा व अभिप्राय पत्रानुसार देण्यात आला आहे.

१. तक्रारदार श्री.दणाणे यांनी कधीही महाविद्यालयाकडे अथवा संस्थेकडे वरील संदर्भात तक्रारी अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्यांबाबत रितसर खुलासा मागणी केलेला नाही अथवा रीतसर पत्रव्यवहार करून तक्रार असल्याबाबत कळविलेले नाही मात्र आपले समोर तक्रार अर्जात पान नंबर २ परि. ९ मध्ये

| | |
|---|---|
| तक्रारीच्या संदर्भात पदाधिका-यांकडे तक्रार अर्ज केला होता का ? | होय |
| असल्यास संबधितांनी उत्तर दिले काय? | नाही |

असे खोटे व चुकीचे शपथेवर प्रतिज्ञा करून नमूद केले आहे, याची गांभीर्याने नोंद घ्यावी

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने श्री किशोर समरीटे विरूध्द् स्टेट ऑफ उत्तर प्रदेश २०१३ (२) एस.सी.सी. पान नंत्र. ३९८ परि. ३६ ते ३८ मध्ये नमूद केले आहे की,

| | |
|---|---|
| 36 | *The party not approaching the Court with clean hands would be liable to be non-suited and such party, who has also succeeded in polluting the stream of justice by making patently false statements, cannot claim relief, especially under Article 136 of the Constitution. While approaching the court, a litigant must state correct facts and come with clean hands. Where such statement of facts is based on some information, the source of such information must also be disclosed. Totally misconceived petition amounts to abuse of the process of the court and such a litigant is not required to be dealt with lightly, as a petition containing misleading and inaccurate statement filed, to achieve and ulterior purpose amounts to abuse of the process of the court. A litigant is bound to make "full and true disclosure of facts". (Refer : Tilokcchand H.B.Motichand v. Munshi, A. shanmugam v. Ariya Kshatriya Rajakula Vamsathu Madalaya Nandhavana Paripalanai Sangam, Chandra Shashi v. Anil Kumar Verma, Abhyudya Sanstha v. Union of India, State of Madhya Pradesh v. Narmada Bachao Andolan, Kalyaneshwari v. Union of India)* |
| 37 | *The person seeing equity must do equity. It is not just the clean hands, but also clean mind, clean heart and clean objective that are the equity fundamentals of judicious litigation. The legal maxim jure naturae aequumest neminem cum alterius detrimento et injuria fieri locupletiorem, which means that it is a law of nature that one should not be enriched by the loss or injury to another, is the percept for Courts. Wide jurisdiction of the court should not become a source of abuse of the process of law by the disgruntled litigant. Careful exercise is also necessary to ensure that the litigation is genuine not motivated by extraneous considerations and imposes an obligation upon the litigant to disclose the true facts and approach the court with clean hands.* |

| 38 | *No litigant can play 'hide and seek' with the courts or adopt 'pick and choose.' True facts ought to be disclosed as the Court knows law, but not facts. One, who does not come with candid facts and clean breast cannot hold a writ of the court with soiled hands. Suppression or concealment of material facts is impermissible to a litigant or even as a technique of advocacy. In such cases, the Court is duty bound to discharge rule nisi and such applicant is required to be dealt with for contempt of court for abusing the process of the court.(K.D.Sharma v. Steel Authority of India Ltd.)* |
|---|---|

वरील निवाडयाचे आधारे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी 'रंजना विश्वनाथ शहाणे विरूध्द् महाराष्ट्र शासन' या न्यायनिवाडयामध्ये परि. १० मध्ये नमूद केले आहे की, खोटी माहिती, वस्तुस्थिती (facts) नमूद करून तक्रार करणारे अर्जदार हे कोणतेही रिलीफ मिळण्यास पात्र नसतात-:

| 10 | It is thus, held by the Apex Court that any suppression of facts by a litigant, for self serving purposes need to be deprecated and even if such a litigant may have a good case on merits, should be deprived of any relief. It is in this backdrop that I am unable to accede to the prayers put forth by the petitioner. |
|---|---|

त्यामुळे निव्वळ याच कारणासाठी तक्रारदार यांचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करण्यात यावा ही विनंती. (मा. न्यायालयाचे निवाडा प्रत आपले माहितीसाठी सोबत जोडत आहे.)

३. तसेच तक्रारदार यांनी उपस्थिती केलेले मुद्दे हे सन २०११ पासून २०१७ पर्यंतचे असल्याचे त्यांच्या अर्जावरून दिसते. तसेच त्यांना मागील ५ वर्षे तक्रार अर्ज करण्यास कोणतीही अडचण अथवा कारण नसल्याचे देखील स्पष्ट होते.

४. तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याचे स्पष्ट होते.'महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सीटी ॲक्ट २०१६ मधील कलम ७९ नुसार ग्रीवंन्स कमिटीची स्थापना झालेली असुन सदर कमिटी मध्ये सेवानिवृत्त न्यायाधीश व डीन यांचे नेमणूकीची मुदत ही तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी नाही.' त्याचप्रमाणे कोणत्याही तक्रारदारास कधीही, कुठल्याही कारणासाठी, केव्हांही सदर कमिटीकडे अर्ज करता येत नाही. सदर कायद्यामध्ये ग्रीवन्स कमिटीकडे कारण घडले पासून तक्रार अर्ज करणेसाठी मुदत कालावधी नमूद नाही. अश्या परिस्थितीत लिमिटेशन ॲक्ट मधील रेसिडयुअरी आर्टिकल ११३ नुसार तीन वर्षाची मुदत येते याची नोंद घ्यावी. त्यामुळे तक्रारदार यांचा तक्रार अर्ज मुदतीत नसल्याने नामंजूर होण्यास पात्र असलेने नामंजूर करावा ही विनंती.

५. तक्रारदार श्री.दणाणे यांचेकडून आजतागायत महाविद्यालय व संस्थेकडे कोणत्याही तक्रारीचा अर्ज प्राप्त झालेला नाही. तक्रारदारास देय ठरणारे वेतन वेळोवेळी अदा केलेले आहे तसेच त्यांचे देय ठरणारे कोणतेही वेतन थकीत नाही.

६. तक्रारदारांनी पूर्वी देखील आपल्या समोर उपस्थित केलेल्या मुद्याबाबतच आदरणीय पंतप्रधान, मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई मा. शिक्षणमंत्री, उच्च व तंत्र संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या निनावी तक्रारीच्या अर्जाच्या संदर्भात मा. प्र.सहसंचालक, उच्च उच्च व तंत्र संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे यांच्याकडून दि.०६/०९/२०१८ रोजी महाविद्यालयामधील

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

चौकशीवेळी तक्रारदार यांनी त्यांच्या स्वखुशीने व स्वहस्ताक्षरामध्ये संस्था व महाविद्यालयाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे लिहून दिले आहे.

७. तक्रारदार यांच्याकडून करण्यात आलेल्या तक्रारी साफ चुकीच्या व बिनबुडाच्या आणि महाविद्यालयास बदनाम करण्याच्या हेतूच्या आहेत. महाविद्यालयाने त्यांच्या व इतर कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कधीही कोणतीही रक्कम कपात करून घेतलेली नाही. सदर कर्मचाऱ्यांचे बेशीस्त वर्तवणुक, महाविद्यालयीन कामकाज अथवा प्रक्टिकल्स वेळी कोणतीही कल्पना न देता/विनापरवानी वैयक्तिक कामास बाहेर जाणे अशा प्रकारचे गंभीर गैरर्वतन विचारात घेऊन संस्थेकडून लेखी स्वरूपात समज काढणेत आलेली असता सदर कर्मचाऱ्यांनी लेखी विनंती केल्यामुळे, त्यांना वर्तवणुकीत सुधारणा करण्याचे दृष्टीने संधी म्हणून त्यांच्या सहमतीने त्यांचे वेतन सप्टेंबर, २०१७ मध्ये कमी करण्यात आले होते.(सोबत संमतीपत्र जोडलेले आहे.)

८. तसेच तक्रारदार यांचे नावे स्वतः प्राचार्यांनी निनावी पत्र पाठवणे व तक्रारदारावर लैंगिक शोषनाचे आरोप करणे असे कोणतेही प्रकार तक्रारदाराविषयी झालेले नाहीत.

९. सदर तक्रारदार हे शिक्षक कर्मचारी असून त्यांची महाविद्यालय व संस्थेच्या मार्फत नेमणूक करणते आली आहे व सदर कर्मचा-याचे नेमणूक पत्र हे नेमणूकीवेळी देण्यात आले आहे. श्री. अनिल आण्णासो दणाणे यांची नेमणूक २०१४ मध्ये महाविद्यालय व्यवस्थापण समितीमार्फत केलेली असता २०१४ ते २०१६ या कालावधीसाठी भविष्य निर्वाह निधी एक्जमशन फॉर्म स्वहस्ते स्वताःच्या स्वाक्षरीने कपात न होणेसाठी महाविद्यालयात जमा केला असल्या कारणाने महाविद्यालयाकडून या कालावधीमध्ये त्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम पी.एफ कार्यालयाकडे भरण्यात आलेली आहे.

१०. तसेच उपदान रक्कम मिळणेस पात्र ठरणा-या सर्व कर्मचा-यांची उपदान रक्कमेची तरतूद महाविद्यालयाने केली आहे.

११. महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज व वातावरण अती उत्कृष्ठ असुन ते प्रगतीपतावर सातत्याने टिकुन राहण्यासाठी सदर कर्मचाऱ्यांबाबत महाविद्यालयाने कायम मानवतावादी व सहानभूतीपूर्वक भुमीका घेतली आहे. तरी देखील आपणाकडे खोटा मजकुराची तक्रार देवुन महाविद्यालय प्रशासनास बदनाम करणे व महाविद्यालयीन कामकाजातील वातावरण बिघडवण्याचे कृत्य करित आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील इतर कर्माच्याऱ्यांवर त्यांचा विपरीत परिणाम होत आहे.

१२. तक्रारदाराने खोटी व चुकीची माहिती नमुद करून अर्ज केला असल्याने तक्रारदाराचा अर्ज नामंजुर केल्याने तक्रारदारचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने तक्रारदाराचा सदरचा तक्रार अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती.

शिवाजी तक्रार निवारण समिती कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

समितीची निरिक्षणे :

१. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये महाविद्यालयाने माहे जून, २०१४ चे वेतन अदा केलेले नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

सदर तक्रारीच्या पृष्ठार्थ तक्रारदार यांनी माहे ऑगस्ट, २०१२ ते मार्च २०१९ पर्यंतचा प्राचार्य, आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी यांची सही व शिक्का असलेला वेतनाचा तक्ता सादर केला आहे. तसेच दि.१८ सप्टेंबर २०२१ रोजीची सादर केलेली माहे फेब्रुवारी २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ व माहे फेब्रुवारी २०१७ ची तक्रारदार यांची सॅलरी सर्टीफिकेट सादर केली आहेत. त्यावर महाविद्यालयाचा शिक्का व प्राचार्यांची सही दिसून येते. तसेच आप्पासाहेब बिरनाळे सहकारी बँक लि. दूधगांव, शाखा मार्केट यार्ड या बँकेकडील SB/GEN(SB)/892/DANANE ANIL ANNASO या अकौंटचे स्टेटमेंट तक्रारदार यांनी सादर केले आहे.

उपरोक्त सर्व कागदपत्रे समितीने पडताळली असता तक्ररदार कथन करतात त्यानुसार महाविद्यालयाने त्यांना माहे जून, २०१४ चे वेतन अदा केले नसल्याची बाब स्पष्ट होते. संस्था व महाविद्यालयाने सदरची बाब नाकारलेली नाही अथवा या तक्रारीबाबत कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण समितीसमोर दिलेले नाही. कोणत्याही सबळ करणाशिवाय शिक्षक/कर्मचा-याचे वेतन थांबविणे ही बाब कायद्यास धरून नाही. सबब तक्रारदार यांना माहे जून, २०१४ चे वेतन मिळणे आवश्यक असलेचे समितीचे मत आहे.

२. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये ऑगस्ट २०१२ ते जानेवारी २०१६ पर्यंतची पी.एफ. ची रक्कम खातेवर जमा केलेली नसल्याचे नमूद केले आहे.

सदर तक्रारीबाबत संस्था व महाविद्यालयाने तक्रारदाराच्या स्वाक्षरीचे फॉर्म क्र.११ जे की, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना १९५२ च्या परिच्छेद ३४ खालील घोषणा पत्र दाखल केलेले आहे. या घोषणा पत्राबददल तक्रारदाराचे म्हणणे असे आहे की, ते घोषणापत्र त्यांचेकडून जबरदस्तीने लिहून घेण्यात आले आहे. सदर घोषणा पत्राची प्रत पडताळणी केल्यानंतर समितीच्या असे निदर्शनास आले की, सदरचा फॉर्म क्रं. ११ हा संबंधीत कर्मचा-याच्या मागील सेवेबाबतची माहिती, त्याच्या पीएफ अकौंट नंबर व इत्यादी माहिती या बाबतचे घोषणापत्र दिसून येते. यामध्ये तक्रारदार यांनी प्रॉव्हिडंट फंड नको असे लिहून दिल्याचे कुठे दिसून येत नाही. तसेच संस्था, महाविद्यालयाने समितीसमोर सादर केलेल्या कर्मचारी भविष्यनिधी संघटन या कार्यालयाकडील दि. २४/०४/२०१९ रोजीचे ॲसिस्टंट पी. एफ. कमिशनर (कंम्लायन्स) रिजनल ऑफिस, कोल्हापूर यांनी महाविद्यालयाला तक्रारदार यांच्या सेवेत रूजू दिनांकापासून पी.एफ रक्कम व तसेच कपात केलेली पी.एफ रक्कम त्यांचे पी.एफ अकौंटवर भरली नसल्याबाबत कारणे दाखवा नोटीस

दिल्याचे दिसून येते. उपरोक्त कागदपत्रे अवलोकनी घेता तक्रारदार यांचा पी.एफ नाकारण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याने तक्रारदाराची नेमणूक दिनांकापासून पी.एफ खाते काढणे व त्याच्या वेतनातून पी.एफ. खातेवर रक्कम वर्ग करणे ही संस्था, महाविद्यालयाची जबाबदारी आहे असे समितीचे मत आहे.

३. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये ऑगस्ट, २०१२ ते सप्टेंबर, २०१७ पर्यंत आपल्या अल्प वेतनातून महाविद्यालयाने लाखो रूपयांची रक्कम जबरदस्तीने कट करून घेतली असल्याची तक्रार नमूद केली आहे.

याबाबत तक्रारदार यांनी समितीकडे दाखल केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये आपण दि.३१/०८/२०१६, दि.१३/०२/२०१७, दि.१३/०७/२०१८, दि.३०/०१/२०१९, लेखी तक्रारी व दि.०२/०५/२०१९, दि.१०/०५/२०१९, दि.१४/०६/२०१९ या दिवशी ई-मेलव्दारे तक्रारी दिलेल्या आहेत. तथापि त्याची दखल घेण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे.

उपरोक्त कागदपत्रे समितीने पडताळणी केली असता त्यामध्ये दि.३१/०८/२०१६,दि. १३/०२/२०१७, दि.१३/०७/२०१८, रोजीच्या लेखी तक्रार पत्रामध्ये तक्रारदार यांचे नाव असल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच सदर पत्रांवर महाविद्यालयाची पोच दिसून येत नाही. दि.३०/०१/२०१९, रोजीच्या पत्रामध्ये तक्रारदार यांचे नाव आहे. त्यावर महाविद्यालयाची पोच नाही. तसेच सदरचे पत्र वेतनातील फरक मिळणेबाबत असल्याचे दिसून येत नाही. याचबरोबर दि.०२/०५/२०१९, दि.१०/०५/२०१९, दि.१४/०६/२०१९ या दिवशी ई-मेलव्दारे दिलेल्या तक्रारीमध्ये महाविद्यालयाने जबरदस्तीने वसूल करण्यात आलेली रक्कम परत मिळणेबाबतची तक्रारदार यांनी मागणी केलेली असल्याचे दिसून येते. सबब सदरच्या पत्रांच्या खरे खोटेपणाबाबत या समितीच्या सिमीत कार्यक्षेमुळे या समितीस त्याची दखल घेता येणार नाही. तो अधिकार दिवाणी न्यायालयाचा आहे. तसेच तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत सादर केलेल्या आप्पासाहेब बिरनाळे सहकारी बँक लि. दूधगांव शाखा मार्केट यार्ड या बँकेकडील SB/GEN(SB)/892/DANANE ANIL ANNASO या अकौंटचे स्टेटमेंट विचारार्थ घेता त्यामध्ये संस्था व महाविद्यालयाकडे कोणतीही ठराविक रक्कम वर्ग केल्याचे दिसून येत नाही. तक्रारदार यांनी सदर खातेमधून स्वतःच वेळोवेळी रक्कम काढली असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. सबब तक्रारदार यांच्या या तक्रारीच्या म्हणण्यास कोणतीही अधिकची पुष्टी होत नाही. सबब संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या वेतनातून वसूली केल्याची तक्रार समितीस ग्राह्य धरता येणार नाही.

४. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये ऑगस्ट, २०१२ ते सप्टेंबर, २०१७ पर्यंत आपल्या अल्प वेतनातून महाविद्यालयाने लाखो रूपयांची रक्कम जबरदस्तीने कट करून घेतली आहे. ती देण्यास आपण नकार दिल्याने कोणत्याही कारणास्तव आपले वेतन कमी केले असल्याची तक्रार नमूद केली आहे.

संस्था, महाविद्यालयाने समितीसमोर दाखल केलेल्या आपल्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदाराचे बेशिस्त वर्तनूक, महाविद्यालयीन कामकाज अथवा प्रॅक्टीकल वेळी कोणतीही कल्पना न देता विनापरवानगी वैयक्तिक कामास बाहेर जाणे अश्या प्रकारचे गंभीर गैरवर्तन विचारात घेवून संस्थेकडील लेखी स्वरूपात समज काढणेत आलेली असता सदर तक्रारदार यांनी लेखी विनंती केल्यामुळे त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा करणेचे दृष्टीने संधी म्हणून त्यांच्या दि.१८/०८/२०१७ रोजीच्या लेखी संमतीने तक्रारदार यांचे वेतन सप्टेंबर, २०१७ मध्ये कमी करणेत आले असल्याचे नमूद केले आहे.

समितीने याबाबत संस्था, महाविद्यालयाने दाखल केलेल्या म्हणण्यातील दि.१८/०८/२०१७ रोजीच्या पत्राची पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांनी सप्टेंबर २०१७ पासून पुढे मिळणारा पगार आपल्या एकमेकांच्या मतऐक्याने ठरविला असून तो मला मान्य आहे. असे नमूद केले असल्याचे दिसून येते. तथापि सदर पत्रावर संस्था, महाविद्यालयाकडून कोणतीही प्रशाकीय स्तरावर आवश्यक ती कार्यपध्दत अवलंबली गेली असल्याची कागदपत्रे समितीसमोर सादर केलेली नाहीत. तसेच तक्रारदार यांच्या सादर केलेल्या मुळ सेवापुस्तकामध्ये सदरची नोंद घेण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास येत नाही. केवळ तक्रारदाराने लिहून दिलेल्या पत्रावर प्रशासकीय स्तरावर आवश्यक ती कार्यवाही न अवलंबविता व सेवानियमानुसार कार्यवाही न करता एखाद्या नियमित कर्मचा-याचे वेतन कमी करणे ही बाब चुकीची असून अशा प्रकारे संस्था, महाविद्यालयास तक्रारदाराचे वेतन कमी करता येणार नाही. सबब तक्रारदार यांचे सप्टेंबर २०१७ पासून कमी करण्यात आलेले वेतन पुर्वतत करण्यात यावे असे समितीचे मत आहे.

५. तसेच तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये माहे फेब्रुवारी, २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ व फेब्रुवारी, २०१७ या महिन्यांची पी.एफ.ची रक्कम महाविद्यालयाने कपात केली. तथापि ती आपल्या पी.एफ खातेवर जमा केलेली नसल्याची तक्रार नमूद केली आहे.

संस्थेने समितीसमोर सादर केलेल्या कर्मचारी भविष्यनिधी संघटन या कार्यालयाकडील दि. २४/०४/२०१९ रोजीचे ॲसिस्टंट पी.एफ. कमिशनर (कंम्लायन्स) रिजनल ऑफिस, कोल्हापूर यांनी महाविद्यालयाला तक्रारदार यांच्या सेवेत रूजू दिनांकापासून पी.एफ रक्कम व तसेच वरील कालावधीमधील कपात केलेली पी.एफ रक्कम त्यांचे पी.एफ अकौंटवर भरली नसल्याबाबत कारणे दाखवा नोटीस दिल्याचे दिसून येते.

या पी.एफ च्या तक्रारीबाबत संस्था, महाविद्यालयाने समितीकडे सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये सदर महाविद्यालयातील तक्रारदार व इतर ११ शिक्षकांची वरील कालावधीतील कपात केलेली पी.एफची रक्कम पी.एफ कार्यालयाकडून नाव नमूद करतेवळी नजरचुकीने संस्थेच्या दुस-या महाविद्यालयातील कर्मचा-यांच्या नावे जमा झालेली होती. ती रक्कम पुनःश्च मिळणेकरता कागदपत्रांची पूर्तता करणे

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

आवश्यक होते. तक्रारदार यांना आवश्यक कागदपत्रे पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले हाते. तथापि त्यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत. इतर ११ प्राध्यापकांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली असल्याने त्यांच्या पी.एफ खात्यावर ती रक्कम जमा झालेली आहे. तथापि तक्रारदारांनी या कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याने त्यांची पी.एफ रक्कम जमा झालेली नाही.

संस्था, महाविद्यालयाच्या या म्हणण्याच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता महाविद्यालयाकडे करून द्यावी. जेणेकरून त्यांची कपात केलेली पी.एफ ची रक्कम पुनःश्च तकरदार यांच्या पीएफ खात्यात संस्था, महाविद्यालयास जमा करता येईल. वेतनातून पी.एफ. खात्याची रक्कम वजा करून ती त्यांच्या पी.एफ. खात्यात नियमानुसार जमा करणे ही संस्था, महाविद्यालयाची जबाबदारी आहे.

६. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये जूलै, २०१६ ते जानेवारी, २०१७ मध्ये नोकरीमध्ये कायम झालेनंतर जवळपास तीन वर्षांनंतर पगाराच्या स्लॅब मध्ये घालण्यात आले. परंतू ते अल्प होते. तसेच त्यामधील फरकाची कोणतीही रक्कम देण्यात आली नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

सदर तक्रारीच्या पृष्ठयार्थ संस्था व महाविद्यालयाने कोणतेही लेखी म्हणणे समितीसमोर मांडलेले नाही. सबब तक्रारदार यांच्या वेतनाबाबत व वेतनातील स्लॅब बाबत समितीचे मत असे की, संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांना नियमानुसार वेतन व त्याचे फायदे देणे बंधनकारक आहे. सबब संस्था, महाविद्यालयाने तक्रारदार यांना नियमानुसार देय असणा-या वेतनाच्या स्लॅबनुसार सन जूलै, २०१६ ते जानेवारी, २०१७ मधील फरकाची रक्कम अदा करणे आवश्यक आहे.

७. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये नेमणूक आदेशाची मुळ प्रत देण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे.

समितीसमोर सुनावणी दरम्यान तक्रारदार यानी आपणास नेमणूक आदेशाची प्रत मिळाली असल्याचे कथन केले. सबब सदर तक्रारीचा मुद्या निकाली काढणेत येतो.

८. तक्रारदार यांनी आपल्या ग्रॅच्युईटीची तरतूद महाविद्यालयाकडून करण्यात आलेली नसल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

याबाबत समितीसमोर महाविद्यालयाने सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये उपदान रक्कम मिळणेस पात्र ठरणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची उपदान रक्कमेची (Gratuity) तरतूद महाविद्यालयाने केलेली असल्याचे म्हटले आहे. सबब तक्रारदार यांची ग्रॅच्युईटीची तरतूद महाविद्यालयाकडून केलेली असल्याचे समितीच्या निदर्शनास येते.

उपरोक्त सर्व बाबी अवलोकनी घेता समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

## आदेश

तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

१. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांचे माहे जून, २०१४ चे वेतन हा आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत अदा करावे.

२. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांची माहे ऑगस्ट, २०१२ ते माहे जानेवारी, २०१६ पर्यंतची पी.एफ. ची रक्कम त्यांचे पी.एफ.खातेवर भरण्याबाबतची कार्यवाही त्वरीत करावी.

३. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांची माहे फेब्रुवारी २०१६ ते माहे ऑक्टोबर, २०१६ व माहे फेब्रुवारी २०१७ या महिन्यांची कपात केलेल्या पी.एफ च्या रक्कमेबाबत तक्रारदार यांचेकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करून घेवून त्याबाबतची पुढील योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी.

४. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांचे सप्टेंबर, २०१७ पासून कमी करण्यात आलेले वेतन पुर्ववत करावे.

५. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांना नियमानुसार देय असणा-या वेतनाच्या स्लॅबनुसार सन जूलै, २०१६ ते जानेवारी, २०१७ मधील फरकाची रक्कम अदा करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 2 5 JAN 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

Akkalekar
सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

Mahajan
सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)